# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९९३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०१६/ 169

दिनांक :- 18 JAN 2017

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित,

पदवी व पदव्यूत्तर पदवी संस्था.

**विषय :- तंत्रशिक्षण महाविद्यालयामध्ये हमीपत्रावर तसेच मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये सन २०१२ ते सन २०१६ या कालावधीत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची माहीती पाठविण्याबाबत.**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २अ/एडीएम/२०१७/१५ दिनांक ७ जानेवारी २०१७.

२. मा.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे पत्र क्रमांक :- आसंप्रस/प्र.क्र.४२/का ३/२००० दिनांक १५/१२/२०१६.

३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०१६/८९ दिनांक १० जानेवारी २०१७.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचेमार्फत पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात. या प्रवेश प्रक्रियामध्ये शासनाच्या निर्देशानुसार मागास प्रवर्गातील उमेदवारांना आरक्षणाचे धोरण अवलंबविण्यात येत असुन शासनाचे निर्देशानुसार ज्या मागास प्रवर्गातील उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही, अश्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याच्या अटीच्या अधीन राहुन व तसेच रुपये १००/- च्य लेखी हमीपत्र सादर करुन प्रवेश घेण्याची तरतुद आहे. त्यानुसार आपल्या संस्थेत मागास प्रवर्गातील उमेदवारांना हमीपत्र घेऊन प्रवेश देण्यात आलेले आहे. अश्या अनुसुचित जमाती विद्यार्थ्यांना हमीपत्रावर मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये प्रवेश दिलेले आहेत तसेच हमीपत्राच्या आधारे मिळालेल्या प्रवेशानंतर जात वैधता सादर केली किंवा कसे ? तसेच मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये प्रवेश पुढे सुरु ठेवण्यात आले किंवा कसे ? याची माहीती संदर्भ ३ चे पत्रासोबत जोडलेल्या पत्रातील सुचनेप्रमाणे व जोडलेल्या **" प्रपत्र अ "** मध्ये सन २०१२ ते २०१६ पर्यंत आपल्या संस्थेत प्रवेश दिलेल्या अनुसुचीत जमातीतील विद्यार्थ्यांची माहीती **दिनांक १३/१/२०१६** पर्यंत Exel Format मध्ये या कार्यालयास सादर करण्यास कळविलेले आहे. तथापी सदर माहीती अजुनपर्यंत या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, सदर माहीती अत्यंत महत्वाची असल्याने विहीत कालावधीत संबंधित विभागास सादर करावयाची आहे, याचा गांभिर्याने विचार करुन माहीती कोणत्याही परिस्थितीत **दिनांक २०/१/२०१६** पर्यंत या कार्यालयास सादर करावी. अन्यथा आपले नाव तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना कळविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.